# अहवाल

राज्यस्तरीय भाषा व सामाजिकशास्त्र संशोधन कार्यशाळा

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा संलग्नित राष्ट्रपिता महात्मा गांधी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय सावली जिल्हा चंद्रपूर, येथे मानव्यविद्या शाखा व गुणवत्ता हमी कक्ष(IQAC) च्या वतीने राज्यस्तरीय भाषा व सामाजिकशास्त्र संशोधन कार्यशाळा दिनांक 25 फेब्रुवारी 2022 रोज शुक्रवारला आभासी पध्दतीने झुम ॲप द्वारे घेण्यात आली या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए चंद्रमौली हे होते तर प्रमुख अतिथीस्थानी डॉ.अक्षय धोटे, इंग्रजी विभाग प्रमुख, सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर हे होते. 'भाषा व साहित्याचे संशोधन' या विषयावर साधन व्यक्ती डॉ. विजय रैवतकर , मराठी विभाग , महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी यांनी मार्गदर्शन केले तर 'सामाजिक शास्त्राचे संशोधन' या विषयावर साधन व्यक्ती डॉ. संदीप तुंडुरवार राज्यशास्त्र विभाग प्रमुख बिझांनी नगर महाविद्यालय नागपूर यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. विजय रैवतकर यांनी भाषा व साहीत्याचे संशोधन या विषयाची मांडनी करताना साहित्य हे जीवनाचं अन्वयार्थ आहे तर साहित्याचे संशोधन साहित्याच्या नवनिर्मितीचा आणि नवीनतेच्या शोधाचं अन्वयार्थ होय. साहित्य समीक्षेच्या परिप्रेक्ष्यातून साहित्य संशोधन करीत असताना केवळ साहित्य संशोधन हे व्यक्तिगत आस्वादाची क्रिया प्रतिक्रिया ठरता कामा नये तर साहित्य संशोधनाला संकल्पना, सिद्धांत, तर्क यांची जोड असली पाहिजे हे करीत असतांना साहित्य संशोधकांनी वस्तुनिष्ठतिचे भान ठेवावे. त्याच बरोबर साहित्य संशोधनाची अभ्यास क्षेत्रे , साहित्य समीक्षा व संशोधन यातील परस्पर अनुबंध आणि साहित्य संशोधनात समीक्षेचा आधुनिक दृष्टीकोन संशोधनाच्या नव्या दिशा ,व सत्यशोधन सौंदर्यशोधन कसे करावे यावर अभ्यास पूर्ण विवेचन डॉ. विजय रैवतकर यांनी केले .तर त्यानंतर डॉ. संदीप तुंडुरवार यांनी सामाजिक शास्त्रांचे संशोधन या विषयाची मांडणी करताना संशोधन हे सत्यान्वेषी असावे. माहितीची जुळवाजुळव म्हणजे संशोधन नव्हे तर संशोधन त्या अभ्यास विषयाला नवी दिशा व मूल्य प्राप्त करणारे असावे.सामाजिक शास्त्राचा विषय आता आंतरविद्याशाखीय न राहता तो बहूविद्याशाखीय झालेला आहे. सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून समाजातील प्रश्न समस्या यांचे उत्तर शोधून सामाजिक उन्नयनाच्या प्रक्रियेमध्ये संशोधन हे हातभार लावणारे असावे असे मौलिक विचार डॉ.संदीप तूंडूरवार यांनी मांडले. कार्यशाळेचे संचालन डॉ. रामचंद्र वासेकर , प्रास्तविक डॉ. अशोक खोब्रागडे यांनी केले कार्यशाळेसाठी तांत्रीक सहाय्य प्रा. संदीप देशमुख यांनी केले तर आभार प्रा. महानंदा भाकरे यांनी मानले . कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रशांत वासाडे प्रा. सदानंद बागडे डॉ. दिवाकर उराडे यांनी सहकार्य केले कार्यशाळेत पदवी,पदव्यूत्तर विद्यार्थी , संशोधक छात्र अभ्यासक व बहुसंख्य प्राध्यापक उपस्थित होते.

# Feed back from participants

Did you get the links of the workshop on time?

407 responses




How relevant and helpful do you find all the sessions?

407 responses




How satisfied were you with the session contents?

407 responses









IQAC
Co-ordinator

Rashtrapita Mahatma Gandhi College, Saoli
Seal

**Principal**
Rashtrapita Mahatma
Gandhi College, Saoli
Dist. Chandrapur